**नि.फौ.के. नं. ११५/२०२५**
**महाराष्ट्र शासन वि. शंकर**
**निशाण क्र. १३**

**(प्रस्तुत प्रकरणातील आरोपी हा न्यायालयीन कोठडीमध्ये आहे. सदर आरोपीस रत्नागिरी मध्यवर्ती कारागृह यांचेकडुन व्हीडीओ कॉन्फरन्सद्वारे हजर करण्यात आले. सदर व्हीडीओ कॉलची आवाज प्रेक्षपणाचा दर्जा तपासुन पाहण्यात आला असुन तो चांगला आहे. सदर आरोपी व्हीडीओ कॉन्फरन्सद्वारे हजर असताना त्याचेसमक्ष साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात येत आहे.**

**सबब, सदर साक्षीदाराची साक्ष खालील प्रमाणे नोंदविण्यात येत आहे.)**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ यांचा जबाब शपथेवर सुरु.**

**नाव** – सचिन विजय भोंगले,
**वय –** ३८ वर्षे, **व्यवसाय** – चालक**, राहणार –** संगमेश्वर, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**अभियोगपक्षातर्फे सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून –**

**०१.** दिनांक १४/११/२०२५ रोजी मी मौजे नेरळ, ता. कर्जत येथे पोलीस अधिकारी – श्री गावीत यांनी बोलावल्याने गेलो होतो. त्यावेळी माझ्यासोबत पोलीस अधिकारी श्री. गावीत, आणखी दोन व्यक्ती सोबत होते. चोरीची घटना घडली होती त्याच्या पंचनाम्यासाठी आम्ही गेलो होतो. नेरळ येथे एका वस्तीमध्ये आम्ही गेलो होतो. तेथे ॲक्टीवा मोटार सायकल क्रमांक एमएच–४६–५१२७ ही होती. सदर गाडीचा तपास करताना गाडीमध्ये एक स्मॉर्ट वॉच, त्याचा पट्टा भगव्या रंगाचा व डायल काळया पांढ्या रंगाचा असे वर्णन असलेले घडयाळ मिळुन आले होते. *(साक्षीदारास वस्तु – इ कडील घडयाळ दाखविण्यात आले). ते तेच घडयाळ असुन त्याच्या लेबलवर*

*अनुक्रमांक ०२ चा पंच म्हणुन माझी सही आहे. पोलीसांनी ते घडयाळ सिल करुन माझी सही घेतली. जितेंद्र जाधव यांनी सुध्दा त्यावर सही केली होती. त्यानंतर पोलीसांनी माझी एका कागदावर सही घेतली. (साक्षीदारास दिनांक १४/११/२०२५ रोजीचा जप्ती पंचनामा दाखविण्यात आला). तो तोच जप्ती पंचनामा असुन त्यावर अनुक्रमांक ०२ चा पंच म्हणुन माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. (सदर* ***जप्ती पंचनाम्याला निशाणी क्रमांक १४*** *देण्यात येते). जो आरोपी त्यावेळी आमच्यासोबत होता, त्याला दाखविल्यास मी ओळखु शकतो.* आज रोजी व्ही.सी.वरुन दिसत असलेला आरोपी हा तोच आहे.

**सरतपास पूर्ण**.

**उलटतपास – आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. आर. एस. जोशी यांच्याकडून** –

**०२**. माझे इयत्ता १० वी पर्यंत शिक्षण झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, जेव्हा पोलीसांना पंचांची गरज असते तेव्हा मी पंच म्हणुन उपस्थीत राहतो. हे म्हणणे खरे आहे की, एखाद्या पंचनाम्यच्या लिखानामध्ये खाडोखाड झाल्यास पंच म्हणुन तेथे लहान सही घेतली जाते, याची मला माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर पंचनाम्यातील ॲक्टीवा मोटार सायकलच्या क्रमांकामध्ये अंक गिरविल्याचे दिसुन येत आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे मी पाहिलेली मोटारसायकल व पोलीसांनी नमुद केलेली मोटारसायकल यांमध्ये संशय निर्माण होतो.

**०३**. हे म्हणणे खरे आहे की, सदर पंचनाम्यामध्ये सदरचा पंचनामा लॅपटॉपच्या सहाय्याने पुर्ण करण्यात आला असुन फिर्यादीच्या दुकानात प्रिंटरवर त्याची प्रींट काढण्यात आल्याचा मजकूर नमुद आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगत असलेला जप्ती पंचनामा हा प्रकरणात दाखल असलेला जप्ती पंचनामा नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीस ठाण्यात बसुन कोऱ्या कागदावर सही केली होती. हे म्हणणे खरे नाही

की, प्रींटरवर प्रिंट निघाली नसल्याने पोलीसांनी पोलीस ठाण्यात पंचनामा लिहुन त्यावर माझी सही घेतली.

**०४**. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यात नमुद केलेला गुन्हा क्रमांक, चतुःर्सिमा मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांच्या सांगण्यावरुन मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सर्व मजकुर मी खोटा कथन केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.02.03 18:17:49 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दिनांक ०३/०२/२०२६ न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,

स्थळः देवरुख जि. रत्नागिरी.

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 03/02/2026 |
| Evidence signed by PO. on | :- | 03/02/2026 |
| Evidence uploaded on | :- | 03/02/2026 |